*This Question Paper contains 8 printed pages.*

Seat No.: | | | | | | | |

Sl. No. : 101852

# 003(M)

**(March, 2022)**

***Time : 3 Hours]*** ***[Maximum Marks : 100***

**सूचना :**

1) **या प्रश्नपत्रिकेचे <u>पाच</u> विभाग करण्यात आलेले आहेत.**

2) **प्रश्नांचे विकल्प आंतरिक आहेत.**

3) **उजवीकडील अंक गुण दर्शवितात.**

4) **लेखनसज्जता, भाषाशुद्धी आणि मौलिक लिखाणास गुण प्राधान्य असेल.**

## विभाग - A
### ( पद्य )

■ **खालील प्रश्नांचे योग्य विकल्प निवडून उत्तरे लिहा :** [3]

1) श्वानाने कोणत्या रंगाचा वेष धारण केला आहे, असे तुकाराम म्हणतात?

(अ) निळा (ब) भगवा

(क) पिवळा (ड) हिरवा

2) कवी उशाला काय घेत आहे?

(अ) पाणी (ब) ओझे

(क) मनाचा दगड (ड) पाचोळा

3) आयुष्यावर कुठला कॅन्सर पसरत गेला असे कवी म्हणतो?

(अ) मालकी हक्काचा (ब) जिवाशिवाचा

(क) साधनांचा (ड) सावलीचा

■ **खालील हेतुलक्षी प्रश्नांची उत्तरे लिहा ( प्रत्येकी 1 गुण ) :** [3]

4) 'दमयंती-स्वयंवर' या काव्याचा साहित्यप्रकार लिहा.

5) 'वेदा आधी तू होतास' या कवितेचे लेखक कोण आहेत?

6) कविता महाजन यांनी कोणत्या काव्याचे लेखन केले आहे?

■ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा ( प्रत्येकी 1 गुण ) :** [4]

**7)** जनाबाई कोणाला मंदिरात घेऊन जात आहे?

**8)** शंकर कोण आहे असे कवी म्हणतो?

**9)** मानव कोणाचे रूप पाहून व्याकूळ होत होता?

**10)** कवी कसा आला होता?

■ **खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा ( कोणतेही तीन ) :** [6]

**11)** सरोवरातील राजहंसाला पकडण्यासाठी नलराजाने काय केले?

**12)** कवी यशवंत यांची खरी कमाई कोणती?

**13)** 'एक प्रकारची प्रार्थना' या कवितेत कवीने समाजातील कोणत्या घटकांचे चित्रण केले आहे?

**14)** कवीच्या मते, ग्रहावरचे लोक अडाणी व निरक्षर कसे आहेत ते थोडक्यात सांगा.

■ **खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा ( फक्त 1 ) :** [4]

**15)** कवितेत 'गोफण' हे रूपक कशासाठी वापरले आहे, व या गोफणाने कवीने कोणा कोणावर हल्ला केला आहे?

**किंवा**

बिरसा मुंडाची वाट कोण-कोण पाहत आहे? सविस्तर स्पष्ट करा.

## विभाग - B

### ( गद्य )

■ **खालील प्रश्नांची योग्य विकल्प निवडून उत्तरे लिहा :** [3]

**16)** सरकार जवळ पोलीस खात्यासह किती पलटणी शिपाई होते? असे लेखकाने सांगितले आहे.

(अ) दोन लक्ष (ब) पाच लक्ष

(क) सात लक्ष (ड) तीन लक्ष

17) मीरा देवीच्या मैत्रिणीचे नाव काय होते?

(अ) वीणा (ब) माधवी (क) स्वरा (ड) अक्षरा

18) आईच्या चेहऱ्यावर कायम काय असे?

(अ) दु:ख (ब) वैराग्य (क) आनंदित स्मित (ड) निराशा

■ **खालील हेतुलक्षी प्रश्नांची उत्तरे लिहा ( प्रत्येकी 1 गुण ) :** [3]

19) 'शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचे उपाय' या पाठाचे लेखक कोण आहेत?

20) मीरा ....... मधुरा! या पाठाचा साहित्यप्रकार कोणता?

21) डॉ. बाळ फोंडके यांनी कोणत्या पाठाचे लेखन केले आहे?

■ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा ( प्रत्येकी 1 गुण ) :** [4]

22) मुलाला भूक लागण्यासाठी आईने काय दिले?

23) युरोपियन शेतकऱ्यांप्रमाणे आपल्या शेतकऱ्यांना सरकारने काय दिले पाहिजे असे फुले यांना वाटते?

24) इंग्रजी अवघड नावाचे फळ कोणते होते?

25) लेखकाला चिखलदारी या गावी काय सापडले?

■ **खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा ( कोणतेही तीन ) :** [6]

26) श्रीमंतांनी फितुरीबद्दल जाब विचारता सखाराम बापू काय म्हणाले?

27) लेखकाला झोपेतून उठविण्यासाठी मित्राने कोणता अघोरी उपाय केला?

28) अनाथालयांतील मुलांचा नामकरणविधी कसा होत असे?

29) विनोबाजींनी बाबांना किती पैसे दिले व का दिले?

■ **खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा ( फक्त 1 ) :** [4]

30) हरिदासांनी निवृत्ती नंतरची कोणती स्वप्ने पाहिली होती?

**किंवा**

'लालचिखल' या पाठाच्या शीर्षकाची समर्पकता पटवा?

## विभाग - C

### ( व्याकरण )

■ **खालील वाक्यांचा पदक्रम योग्य क्रमात जुळवून वाक्य पुन्हा लिहा :** [ 2 ]

31) अंगठी परत ती आपण पेटीत ठेवू लाकडी.

32) ठिकाणी परमेश्वराच्या शक्ती आहेत अनेकविध.

■ **खालील समानार्थी शब्दांच्या जोड्या शोधून पुन्हा लिहा :** [ 2 ]

33) नदी — विहंग — तरू

34) पक्षी — वृक्ष — पद्‌म

35) झाड — सरिता — खग

36) कमल — पंकज — वाहिनी

■ **खालील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधून पुन्हा लिहा :** [ 2 ]

37) तारुण्य × निर्गुण

38) प्रकाश × वार्धक्य

39) सगुण × कृतघ्न्

40) कृतज्ञ × अंधार

■ **खालील शब्दसमूहांसाठी एक शब्द द्या :** [ 2 ]

41) पावसाळ्यात आकाशामध्ये दिसणारी सात रंगी कमान –

42) न शोभणारे –

43) ज्याच्या कडे शस्त्र नाही असा –

44) कधीही मृत्यू येत नाही असा –

■ **खालील वाक्याचे कंसांतील सूचनेनुसार वाक्यात रूपांतर करा :** [ 1 ]

45) तुझ्या बोलण्यावर मी कसा विश्वास ठेवू?
(नकारार्थी करा)

**खालील वाक्याचे कंसांतील सूचनेनुसार वाक्यात रूपांतर करा :** [1]

46) ती मुलगी देखणी आहे. कष्टाने तिचा चेहरा सुकला आहे.
(संयुक्त वाक्य करा)

**खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समास प्रकार सांगा :** [1]

47) दिव्यदृष्टी -

**खालील वृत्ताचे उदाहरण देऊन लक्षणे सांगा :** [1]

48) लहान अभंग

**खालील अलंकाराचे उदाहरण द्या :** [1]

49) यमक

**खालील वाक्यातील प्रयोग ओळखा :** [1]

50) कोणी ही खोटे बोलू नये.

**खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा :** [1]

51) शहानिशा करणे

52) सांगता करणे

**खालील ग्रामीण शब्दांना प्रचलित मराठी शब्द द्या :** [1]

53) इच्यारलं

54) आखरीला

**खालील अशुद्ध शब्द शुद्ध करून लिहा :** [1]

55) आशिरवाद

56) निरमल

**खालील दिलेल्या शब्दांमधील अर्थभेद लिहा :** [1]

57) घन - धन

■ **खालील म्हणींचे अर्थ लिहा :** [1]

**58)** गरज सरो नि वैद्य मरो.

**59)** नाचता येईना अंगण वाकडे.

■ **खालील वाक्यात विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा :** [1]

**60)** त्या दिवशी कसली पार्टी करायची

## विभाग - D

## ( अर्थग्रहण )

■ **खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** [5]

हिरवळ आणिक पाणी
तेथे स्फुरती मजला गाणी
निळीतुनी पाखरे पांढरी किलबिलतात थव्यांनी ॥१॥
सुखांत चरती गुरेवासरे
लवेतुनी लहरते कापरे
हवेतुनी आरोग्य खेळते गार नि आरसपानी ॥२॥
उरी जिथे भूमीची माया
उन्हात घाली हिरवी छाया
सांडित कोमल आनंदाचे पाझर पानोपानी ॥३॥
माणूस जेथे हवाहवासा
अभंग-ओवीमध्ये दिलासा
विश्वासावर जीवन सुस्थिर, श्रद्धा नेक इमानी ॥४॥
देव जिथे हृदयात सदाचा
भार मनाला नसे उदयांचा
सुखे दुजाच्या हिरवळ चित्ती, दु:खे डोळा पाणी ॥४॥

– बा. भ. बोरकर

**प्रश्न :**

**61)** कवीला गाणी कुठे स्फुरतात?

**62)** निळीतुन कोण किलबिल करीत आहे?

**63)** कवीच्या मनाला कुठे दिलासा वाटतो?

**64)** जीवन कुठे सुस्थिर होते?

**65)** कवितेला योग्य शीर्षक द्या.

■ **खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** [5]

'देवा'चा उपयोग भीती घालवण्यासाठी केला जातो, तसाच भीती घालण्यासाठी ही केला जातो. लहानपणी खोटं बोललो, चोरी केली तर 'बाप्पा शिक्षा करेल', असं मोठी माणसं आपल्याला बजावत असतात. देव सगळे पाहत असतो. पाप केलं तर देवाचा कोप होतो. थोडक्यात देवाला पोलिसाची भूमिका दिली जाते, पण माणसं या देवालाही सोन्याच्या दागिन्यांची, 'लाच' देतात. वर्षभर पापाचा पैसा कमवायचा आणि एकदा तिरुपतीला जाऊन काही दान करून यायचं, अशी अनेक माणसं मी पाहिली आहेत. ही माणसं देवाला, 'पाप टांगण्याची खुंटी' बनवून टाकतात आणि नव्यानं पाप करायला मोकळी होतात. जे देव मानत नाहीत, त्यांना अशी 'पापमुक्ती'ची सोय उपलब्ध नसते. त्यांना सदसद्विवेकबुद्धीच वापरावी लागते. 'मन खात राहतं' हीच त्यांची शिक्षा असते.

– शिवराज गोर्ले

**प्रश्न :**

66) 'देवा'चा उपयोग कशा कशासाठी केला जातो?

67) देवाला केलेले दान हे लेखकांच्या मते काय आहे?

68) लेखक देवाला 'पाप टांगण्याची खुंटी' असे का म्हणतो?

69) देव न मानणारे कोणत्या गोष्टींचा आधार घेतात?

70) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

■ **खालील उताऱ्याचा $1/3$ भागात सारांश लिहा व उताऱ्यास योग्य शीर्षक द्या :** [5]

71) 'अग्नि' मुळे शस्त्रास्त्र क्षेत्रात भारताचा दबदबा वाढला. देशाच्या सामर्थ्याची जाणीव जगाला झाली. दुसऱ्या कुठल्या देशाने भारताला युद्धात ओढण्यापूर्वी दहा वेळा विचार करायला हवा, अशी भावना फैलावली. आजच्या जगात तंत्रज्ञानात मागे असणे दुर्बलतेचे लक्षण आहे. संरक्षणासारख्या क्षेत्रात अशी दुर्बलता कोणत्याही देशाला परवडणार नाही. आपल्या देशाचे संरक्षण, एकता, अखंडता कोणत्याही बाह्य दडपणाला बळी न पडता राखणे हे आपले कर्तव्यच आहे. आमच्या पूर्वपिढ्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान केले, त्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आपले परम कर्तव्य बनत नाही का? अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेतल्याशिवाय आज कुणालाही समर्थ होणे, सबल राहणे शक्य नाही.

– डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

■ **खालील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून तो कालक्रमानुसार लिहा :** [5]

72) मी तुझी केवळ परीक्षा घेत होतो. दुसरा कोण असता तर मला केव्हाच सोडून निघून गेला असता. श्रीरामकृष्ण अतीव आनंदाने भरून गेले. मी बाह्यत: तुझ्याकडे दुर्लक्ष करीत आहे म्हणून तू येणे थांबवतोस की काय हेच मी पाहत होतो. तुझ्यासारखी

आंतरिक शक्ती असणारा मनुष्यच माझे दुर्लक्ष करणे सहन करू शकतो. आपल्या या शिष्याला आलिंगन देत ते म्हणाले.

## विभाग - E

### ( लेखन )

73) शाळेत - सोसायटीत 'स्वच्छता अभियान' या विषयावर अहवाल लेखन करा. [5]

74) **खाली दिलेल्या मुद्दयांच्या आधारे सुमारे 100 शब्दांत गोष्ट तयार करा व त्यास योग्य शीर्षक दया.** [5]

एका गृहस्थाची अंगठी चोरली गेली — नोकराचा संशय — त्याच्याकडून नकार — न्यायालयात प्रकरण — न्यायाधिशाची युक्ती — समान लांबीच्या काठ्या सर्वांना दिल्या — चोराची काठी एक इंच वाढेल — खऱ्या चोराने एक इंच काठी कापली — दुसऱ्या दिवशी न्यायाधिशाचा निर्णय — बोध.

**किंवा**

■ **खालील कल्पनेचा 100 शब्दांत विस्तार करा :**

विना सहकार, नाही उद्धार.

■ **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 250 शब्दांत निबंध लिहा :** [10]

75) वाचन - एक उत्तम छंद :

प्रस्तावना — वाचनामुळे प्रगल्भता — 'वाचाल, तर वाचाल' हे डॉ. आंबेडकरांचे सार्थ उद्गार — मुद्रणकला — ज्ञानाचे भांडार खुले — भूतकाळ व वर्तमानकाळ यांची सांगड — वाचनाची ओढ हवी — व्यक्तिमत्व संपन्न होते — अडचणींवर मात करण्याचे सामर्थ्य मिळते — चांगले पुस्तक विचारप्रवृत्त करते ....

**किंवा**

मी पाहिलेला क्रिकेटचा सामना :

प्रस्तावना — विश्वचषक सामन्यात आलेले अपयश त्यामुळे निंदानालस्ती — मन दुखावले — बांगलादेशात सामने — फलंदाजीतील पराक्रम — शतकांची आतीषबाजी — गोलंदाजीतील विक्रम — मिळालेले यश — यशाचा परिणाम .....

**किंवा**

शेतकरी सुखी तर जग सुखी :

प्रस्तावना — वाढती लोकसंख्या — अपुरी जमीन — उत्पादनक्षमता वाढवण्याची गरज — संशोधन — तंत्रज्ञानाची मदत — अपुरे प्रयत्न — शेतीप्रधान देश — अपुरी साधनसामग्री — मार्गदर्शनाची गरज ......

◆◆◆